VOL- VII ISSUE- IX SEPTEMBER 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# युती शासनाची कार्य संपादणुकः एक अभ्यास

**श्री.रमेश जगन्नाथ निकम**
संशोधक विद्यार्थी, सहाय्यक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग,
के.टी.एच.एम.महाविद्यालय, नाशिक

**डॉ.डी.आर.भागवत**
संशोधन मार्गदर्शक तथा राज्यशास्त्र विभागप्रमुख
कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभरणी

**प्रस्तावना-**

१९९५ मध्ये महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका घेण्यात आल्या. या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव करून शिवसेना-भाजप युतीचे सरकार स्थापन झाले. भाजप युतीचे शासन सत्तेवर येताच सरकारने धडाक्याने महत्वाचे निर्णय घेण्यास सुरूवात केली. निवडणुकी नंतरच्या पहिल्याच अर्थसंकल्पात तीन नव्या योजनांची घोषणा करण्यात आली. गरीब बुध्दीमान विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य देणारी एकलव्य शैक्षणिक योजना दारिद्रय रेषेखालील लोकांच्या मोतीबिंदू आणि इतर दृष्टीविषयक रोगांवर शस्त्रक्रिया करण्यासाठी दृष्टीदान योजना अदिवासी भागातील कुपोषण थाबविण्यासाठी आणि सरकारच्या विविध योजनांचा समन्वय साधण्यासाठी नवसंजीवनी योजना अशा या तीन योजना होत्या युतीच्या वचननाम्यातील आश्वासनानुसार गहू, तांदूळ, साखर, तूरदाळ व खाद्यतेल या पाच वस्तूचे दर ५ वर्ष कायम ठेवण्याची घोषणा मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी २३ मे १९९५ ला केली. आणि युतीच्या काळात हे दर स्थिर ठेवण्यात यशही मिळविले. युतीच्या राजकारणात महाराष्ट्राच्या आणि हिंदुत्वाच्या अस्मितेचा भाग महत्त्वाचा होता. त्यामुळेच मुंबईचे 'बॉम्बे' हे सरकार दरबारी अधिकृत मानले जाणारे नाव बदलण्यासाठी आणि ते मुंबई करण्यासाठी युती सरकारने पुढाकार घेतला आणि तसा प्रस्ताव केंद्र सरकारला पाठविण्यात आला. तो प्रस्ताव मान्य होवून केंद्रीय मंत्रिमंडळाने 'बॉम्बे' चे 'मुंबई' असे नामकरण करण्यास संमती दिली आणि लगेचच त्याची अंमलबजावणी केली. या बरोबरच मुंबईतील 'व्हिक्टोरिया टर्मिनस' या रेल्वे स्थानकाचे नाव बदलून 'छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस' असे करण्यातही युती शासनाला यश मिळाले.

'एन्रॉन करार' रद्द करण्याची घोषणा युतीने निवडणूक प्रचारात केली होती. यासाठी सत्तेवर आल्यानंतर उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वाखाली समिती नेमली. समितीचा अहवाल सरकारला सादर झाल्याबरोबरच मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी १९९५ ला एन्रॉनशी केलेला करार संपूर्णपणे रद्द केल्याची घोषणा केली. यावर मार्ग काढण्याठी एन्रॉन कंपनीने युती शासनासोबत यशस्वी वाटावाटी केल्या. प्रकल्पाच्या उभारणीसाठी पूर्वीच्या सरकारने जे करार केले होते. त्यांची पुर्नरचना केली पूर्वीच्या करारामुळे महाराष्ट्राचे होणारे नुकसान युती सरकारने टाळले असा दावा मुख्यमंत्र्याकडून केला गेला. युती शासनाने सत्तेवर येण्यापूर्वी दिलेल्या वचनाम्याची पुढील प्रमाणे अमंलबजावणी केली.

**वचननाम्यानुसार केलीली कामे**

➢ **कृष्णा खोरे विकास मंडळाची स्थापना**

कृष्णा नदीचे खोरे महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र प्रदेश या तीन राज्यांत विभागले गेले. यापैकी महाराष्ट्राच्या वाटयाला आलेल्या ५९४ अब्ज घनफुट पाण्याचा पुरेपूर वापर करण्यासाठी युती शासनाने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाची स्थापना केली. कृष्णा खोऱ्यातील पाटबंधारे प्रकल्पांना चालना दिली या प्रकल्पामुळे दुष्काळग्रस्त असलेले ४८ तालुके सिंचनखाली आली.

➢ **स्थानिकांना राज्यात नोकरी मध्ये ८० टक्के प्राधान्य सेना**

भाजप युतीचे शासन सत्तेवर आल्यानंतर स्थानिकांना नोकर भरतीत ८० टक्के प्राधान्य देण्याचे धोरण राबविले गेले. याबाबत राज्य शासनाच्या सेवायोजन संचालनालयाला प्राशासकीय स्तरावर सुचना देऊन उमेदवरांना मुलाखतीत पाठवितांना स्थानिक उमेदवारच पाठविले जातील यासाठी दक्ष राहण्याचे आदेश दिला.

➢ **टँक्टरमुक्त महाराष्ट्र**

१९९५ मध्ये विधानसभा निवडणुकीच्या वेळी जनतेला दिलेल्या वचननाम्यात आम्ही पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाला सर्वोच्यप्राध्यान्य देऊ असे वचन दिलेले होते त्यानुसार २००० सालापर्यंत महाराष्ट्र टँक्टरमुक्त करण्याच्या दृष्टीने युती शासन कामाला लागले. यासाठी पाण्याच्या प्रश्नाचा कायमस्वरूपी मुकाबला करण्यासाठी शासनाने एक श्वेतपत्रिका काढली. टँक्टर मुक्तीसाठी युती शासनाने १००० कोटी रूपये खर्च केले व १८ जिल्हे टँक्टर मुक्त केले.

➢ **एक रूपयात झुणका भाकर**

गरिबांच्या हाकेला धावून जाणाऱ्या युती शासनाने राज्यात कुणालाही उपासमारीची वेळ येऊ नये म्हणून एक रूपयात झुणका – भाकर देण्याची योजना राबविली होती. झुणका – भाकर केंद्र चालविण्याच्या केंद्र चालकाला २५ हजार रुपये अनुदान दिले जात होते. या योजनेला जनतेचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाल्याचे दिसून येते. राज्यात १९९८ पर्यंत ५२४८ झुणका – भाकर केंद्रे कार्यान्वित झाली होती. जवळवास १२ लाख लोक दररोज त्याचा फायदा घेत असत.

➢ **स्वच्छतेचा प्रश्न**

ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाला गती देण्यासाठी खेडोपाडी महिलांसाठी शौचालये बांधण्याच्या दृष्टीने प्रत्येक ग्रामीण कुटूंबासाठी एक शौचालय हा महत्वकांक्षी कार्यक्रम युतीशासनाने १९९६ पासून हाती घेतला. या योजनेअंतर्गत राज्यात १९ लाख स्वच्छतागृहे बांधली. युती शासनाच्या या कामगिरीची प्रशंसा जागतिक बँक आणि केंद्र शासनाने केली होती.

➢ **पाच जिवनावश्यक वस्तुंचे स्थिर भाव**

युती शासन सत्तेवर येताच राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारा वितरीत होणाऱ्या तांदूळ, गहू, साखर, खाद्यातेल व तूरदाळ या पाच जीवनावश्यक वस्तूंचे भाव पुढील पाच वर्षासाठी स्थिर ठेवण्याचा निर्णय दिनांक १ जून, १९९५ या दिवशी घेतला या निर्णयाची पाच वर्ष काटेकोर अमंलबजावणी केली असल्याचे दिसून येते.

➢ **जीवनदायी योजना**

महाराष्ट्रात बहुतांशी लोक अल्प उत्पनाच्या कक्षेत येतात. त्यामुळे अनेक रोगावर उपायासाठी येणारा खर्च सर्वसामान्यांना परवडू शकत नाही. त्यासाठी जीवनदायी योजना ११ ऑक्टोबर १९९७ पासून सुरू करण्यात आली होती. या योजने अंतर्गत १९९९ पर्यत १००० लोकांवर वेगवेगळया रोगांच्या यशस्वी मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

➢ **नीतिमुल्यांचे शिक्षण**

भविष्यात जबाबदार नागरिक घडविण्यासाठी युती शासनाने शालेय विद्यार्थ्यांना नीतिमुल्याचे शिक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, जातीय सामंजस्य, स्त्री–पुरूष समानता, श्रमप्रतिष्ठा, वैज्ञानिक दृष्टिकोन, संवेदनशिलता, सौजन्यशिलता, वक्तशीरपणा आणि नीटनेटकेपणा या दहा मुख्यांचे शिक्षण घेणे सक्तीचे करण्यात आले.

➢ **महाराष्ट्र छात्रसेना**

युती सरकारने विद्यार्थ्यांमध्ये अनुशासन, शिस्त, एकता, खिलाडू वृत्ती, सेवाभाव व राष्ट्रीयत्वाची भावना जोपासण्यासाठी राष्ट्रीय छात्रसेनेच्या धर्तीवर राज्यात महाराष्ट्र छात्रसेनेचे शिक्षण देण्यास सुरूवात केली. या उपक्रमामुळे आपण काही समाजाचे देणं लागतो आहे. ही भावना विद्यार्थ्यामध्ये निर्माण होत गेली.

➢ **सैनिकी शाळा**

राष्ट्रतेजाची परंपरा कायम चालू रहावी म्हणून युती शासनाने सैनिक शाळा स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. याच धोरणाचा भाग म्हणून राज्यात धुळे, उस्मानाबाद, अमरावती, अहमदनगर, पुणे आणि ठाणे या १२ जिल्हात सैनिक शाळा सुरू करण्यात आल्या.

➢ **झोपडपट्टी पुनर्वसन कार्यक्रम**

मुंबईतील ४० लाख झोपडपट्टीवासीयांना ४० लाख घरे मोफत देण्याचे अभिवचन युतीने निवडणुक जाहितनाम्यात दिले होते. या योजनेचे काटेकोर नियोजन करण्यासाठी शासनाने झोपडपट्टी प्राधिकरणाची स्थापना केली. मात्र या योजनेला विकासकांनी प्रतिसाद न दिल्यामुळे त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात युती शासनला यश आले नाही.

➢ **मातोश्री वृध्दाश्रम**

ज्येष्ठ नागरिकांना वृध्दापकाळ सुसह्य व्हावा व त्यांना आपले उर्वरित जीवन सुखा समाधानाने जगता यावे. म्हणून युती शासनाने मातोश्री वृध्दाश्रम योजना सुरू केली होती. या ठिकाणी शासनाने १७ ठिकाणी वृध्दाश्रम कार्यान्वित केले होते. या वृध्दाश्रमात ६० वर्षावरील पुरूष व ५५ वर्षावरील स्त्रियांना प्रवेश दिला जात असे. या ठिकाणी वृध्दांना दवाखाना, दूरदर्शन संच, उद्यान, वाचनालय, सभाकक्ष इत्यादी, सोयी शासनातर्फे उपलब्ध करून दिल्या जात असे.

➢ **कायदा व सुव्यवस्था –**

युती शासनाच्या साडेचार वर्षाच्या कार्यकाळात कायदा सुव्यस्थेची स्थिती चांगली होती. असा दावा या शासनाकडून करण्यात येतो. युर्ती शासनापुर्वी म्हणजे १९९१ – १९९४ या काळात राज्यात ३५०० जातीय दंगली घडल्या होत्या, तर युती शासनाच्या कार्यकाळात फक्त १९ जातीय दंगलीच्या घटना घडल्या होत्या. या बरोबर शहिद पोलिसांच्या कुटूबियांना १ लाख रूपयांऐवजी २ लाख रूपये नुकसान भरपाई देण्यात येऊ लागली.

**सारांश–**

शहरी भागातील रस्त्यांची कामे, मुंबईतील उड्डाणपूल, आरोग्य विज्ञान विद्यापीठाची स्थापना सिंचन वृध्दीसाठी केलेले प्रयत्न, मातोश्री वृध्दाश्रम योजना, मुंबईतील गुंडगिरीचा बिमोड, मुलींना बारावी पर्यंत मोफत शिक्षण प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी महाविद्यालय, सैनिकी शाळा, या युती शासनाच्या जमेच्या बाजु होत्या. परंतू झुणका भाकर केंद्र वाटपातील अनियमितता, फसलेली झोपडपट्टी पुनर्वसन योजना,

बेरोजगार युवकांना २७ लाख नोकऱ्या मिळवून देण्यात आलेले अपयश, महाराष्ट्राला टँकरमुक्त करण्याचे दिलेले वचन पुर्ण न होणे. एन्रॉनला विरोध करून पुन्हा एन्रॉनशी करार करून महागडी वीज खरेदी करणं या बाबी युती शासनाच्या उणीवा दाखविणाऱ्या ठरल्या. एकंदरित पहिले बिगर कॉंग्रेस सरकार म्हणून आपल्या कार्याची वेगळी ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न युती शासनाने केलेला दिसतो.

**संदर्भ ग्रंथ**

१. कोलारकर शं.गो., 'मराठयांचा इतिहास', मंगेश प्रकाशन, नागपूर-१९९८
२. मनोहर गजानन जोशी, 'शिवसेनेची निर्मिती', वाढ, स्वरूप यशापयश आणि भवितव्य
नवचैतन्य प्रकाशन, बोरिवली, मुंबई
३. 'साप्ताहिक मार्मिक', १६ जुलै १९६६
४. मनोहर जोशी, शिवसेना निर्मिती, वाढ, यशापयश आणि भवितव्य.
५. योगेंद्र ठाकुर, शिवसेना समज-गैरसमज,अमोद प्रकाशन, मुंबई २००१